सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग,बृहन्मुंबई

दुरध्वनी ०२२–२८२८३८८९

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१२,
यांचे कार्यालय, शैलेंद्र नगर, वृंदावन रोड,
दहिसर (पुर्व), मुंबई–४०००६८.

Email ID -dcpzone12-mum@mahapolice.gov.in

---

**वार्तापत्र (Press note)** **दि. ०३/११/२०२३**

## अंमली पदार्थाच्या विक्रीत सक्रीय असलेल्या विदेशी नागरीक यांना अटक केल्याबाबत.

दिंडोशी पोलीस ठाणे गु.नों.क्र. ३२३/२३, कलम ८ (क), २२, २२ (क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ सह कलम १२ (१) (ग) पारपत्र अधिनियम, १९६७ सह कलम १४ विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ या गुन्हयातील पाहीजे आरोपींच्या शोध तपासादरम्यान दि. २८/१०/२०२३ रोजी एका नायजेरीयन महिलेस चिंचपाडा, वसई पुर्व, जि. पालघर व दि. ०२/११/२०२३ रोजी एक टांझानियन महिलेस नालासोपारा पुर्व, वसई-विरार, जि. पालघर याठिकाणाहून अटक करण्यात दिंडोशी पोलीसांना यश प्राप्त झाले आहे. यामधील आरोपीत टांझानियन महिलेच्या राहत्या घरात ४.५ ग्रॅम वजनाचे 'कोकेन' आणि वाणिज्यिक प्रमाणामध्ये १०० ग्रॅम वजनाचे 'एम.डी.' हा एकुण २६,१२,५००/- रू. आंतरराष्ट्रीय मुल्य असलेला अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला.

गुन्हयाच्या तपासात यापुर्वी एकुण ३ भारतीय व १ नायजेरीयन पुरूष यांना अटक करून त्यांचेविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र सादर केल्यानंतर आपले अस्तित्व लपवुन राहणाऱ्या उपरोक्त पाहीजे महिला आरोपींचा बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेण्यात येत होता. सदर शोधतपासादरम्यान नमुद आरोपी महिलांपैकी नायजेरीयन महिलेस दि. २८/१०/२०२३ व टांझानियन महिलसे दि. ०२/११/२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाच्या अदयापपावेतो केलेल्या तपासात अदयापपर्यंत वाणिज्यिक प्रमाणामध्ये एकुण २२९.३३ ग्रॅम वजनाचा 'एम.डी.' आणि ४.५ ग्रॅम वजनाचा 'कोकेन' हा एकुण ५८,४५,७५०/- रु आंतरराष्ट्रीय मुल्य असलेला अंमली पदार्थ जप्त करण्यात दिंडोशी पोलीसांना यश आले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कारवाई ही मा. श्री. सत्य नारायण, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई, मा. श्री राजीव जैन, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग,मुंबई, मा. श्रीमती स्मिता पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई, मा. दत्तात्रय ढोले, सहाय्यक पोलीस आयुक्त, दिंडोशी विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. जीवन खरात, पो. नि. धनंजय कावडे, सपोनि. सुरज राऊत, सपोनि, डॉ. चंद्रकांत घार्गे, पोउनि. अजित देसाई व पोलीस पथकातील पोहक्र. ९६०९३२/बोराटे, मपोहक्र. ९९०५१४/तारळेकर, पोहक्र. ०६१४६९/पाटील, मपोशिक्र. ०९२७५४/माचरेकर, पोशिक्र. ०९३५९०/वाघमारे, पोशिक्र. १११३८१/पवार, मपोशिक्र. ११३५०८/रावत, पोशिक्र. १४०४६४/गायकवाड यांनी केलेली आहे.